या सर्वांच्या पुढे गेलो तर या प्रत्येक टप्प्यावर भेटणाऱ्या स्त्रिया चिंतनाचा स्वतंत्र विषय ठरु शकतात, एवढी आवाहकता त्यांच्या धडपडीतून ठिबकतांना दिसून येते.

भ्रष्टाचार हा 'पडझड'चा आत्मा आहे. हे समजायला वेळ लागत नाही. जीवनाचे प्रश्न सोडविण्यासाठी पैसा लागतो. ज्या माणसांकडे पैसा असतो ती माणसे समाजातील माणसांचे हरेक तऱ्हेने शोषण करु शकतात, हा समज निश्चित झाला आहे. तुक्याला मोठे होण्यापासून कोसो दूर ठेवणारा पैसाच आहे. आपण खूप शिकावं, नौकरीला लागावं. 'वडार' समाजाचा गुन्हेगारीचा कलंक साफ पुसून टाकावा, या विचाराने प्रेरित होऊन तो शिकतो. नामांकित शैक्षणिक संस्थांची बदमाशी त्याच्या लक्षात येते. त्याला डावलल्या जाते. मोठे होण्याची स्वप्ने त्याला दाखविली जातात. कधी आपल्या तर कधी परक्या माणसांकडून. नाम्या त्यातीलच एक. साहेब असल्याची फुशारकी मारणाऱ्या नाम्याचा त्याच्या मायबापाला जाम अभिमान आहे. तो एम.ए.बी.एड. आहे. परंतु या २१ व्या शतकात त्याच्या पदव्या त्याला दोन पैसे देऊ शकत नाही. तो भीक मांगतांना तुक्या पाहतो व त्याला वास्तव समजते. नाम्या उद्वेगाने म्हणतो, ''भ्रष्टाचारांनी समदा देश बरबटला. साले समदे एकजात हरामखोर आहेत. माणसाला गुलाम बनविणाऱ्याच्या आयले झवतो. बेरोजगारीच्या खाईत जळून खाक झाली. इलाज राहिला नाही. तवा ही भीक मागायची नौकरी सुरु केली.'' हिजडा नसतांना हिजड्याचं लाजीरवाणं जीवन जगणारा 'पडझड'मधील दुसरा पराभूत अभिमान दिसून येतो. बेरोजगारीवर उपाय त्याने शोधला आहे. तुक्याच्या समोर आता वाटा सताड उघड्या आहेत. एम.ए.,बी.एड. झालेला नाम्या, एम.ए. झालेला अभिमान आणि बी.ए. झालेला तुक्या जागतिकीकरणातील, त्याहीपेक्षा २१ व्या शतकातील भारतीय संस्कृतीची 'पडझड' अधोरेखित करून जातात.

माणसांची संस्कृतीकडून कोणती अपेक्षा असते आणि संस्कृती त्यांना काय देते? आपण संस्कृतीच्या गप्पा मोठ्या उजागर डोक्याने का झोडतो? यासारखे अनंत प्रश्न या 'पडझड'मधून पडत जातात. लेखकांनी या प्रश्नांना उपस्थित करुन चिंतनाला जणू प्रारंभ केला आहे. 'पडझड' मानवी वेदनेसह उत्कृष्टपणे उभी राहते. ती भाष्य करते गावगाड्यावर, समाजावर, पुरूषी अहंकारावर, स्त्री शोषणावर, नेतृत्वावर, शिक्षणावर, जातीवर, राजकारणावर, शासकीय उदासिनतेवर, भ्रष्टाचारावर, बेरोजगारीवर, संसदेवर या देशाच्या लोकशाहीवर. नाम्याच्या वेदनेने या 'पडझड'चा शेवट झाला असता तर ही आत्मकथनात्मक कादंबरी वाचकांना विचलीत करू शकली असती. तरीही ती आपल्या एक स्वतंत्र बैठकीत संपते हे तिचे यश म्हणावे लागेल. ■


REDMI NOTE 6 PRO
MI DUAL CAMERA

अशी धमकी भरणारा गोइंद्या एकप्रकारे शोषकांच्याच जातीचा प्रतिनिधी म्हणावा लागेल. जेव्हा तो अडचणीत येतो तेव्हा तीन माणसे त्याला रात्रभर मुक्कामी ठेवतात. ही माणसे मारझोड करतीलही परंतु सद्भावनाही त्यांचे वेगळेपण स्पष्ट करते. हाच त्यांचा चांगुलपणा त्यांच्या शोषणाचे कारण बनतो.

'पडझड' या कादंबरीसाठी फार काही वेगळी बैठक लेखकाला मारावी लागली असे दिसत नाही. भाषेचा सोस नाहीच. भाषिक सहजता या कादंबरीचे वैशिष्ट्य ठरावं अशा अंगाने ती तयार झाली आहे. संवादाच्या माध्यमातून तर वाचक तुक्याच्या बिराडापर्यंत पोहचून जातो. तिथली माणसे तो प्रत्यक्षात पाहू लागतो एवढे सामर्थ्य संवादामध्ये आहे. जे बघितलं, ऐकलं, तेच सांगितलं हे सहज समजते. परंतु तुकारामची अंतर्मनातील ठणक सहज घेता येणार नाही. बी.ए.सुरु असतांना द्यावा लागणारा आत्मसन्मानाचा बळी भयंकर आहे. कारण वसतीगृहात राहायचे तर मन मारण्याशिवाय पर्याय नाही. कारण बी.ए.झाल्याशिवाय नौकरी मिळणार नाही व तोपर्यंत सारं दारिद्र्य धुता येणार नाही. त्यासाठी 'गोबरा' नामक व्यक्तीचे अत्याचार सहन करणे आलेच. तशातही राठोड साहेबांसारख्या माणसांबद्दलची कृतज्ञता लेखक व्यक्त करतो.

'पडझड' वाचत असतांना यातील स्त्री व्यक्तीरेखा लक्ष वेधून घेतात. पुरूषी अहंकाराच्या बळी ठरलेल्या स्त्रिया जिवंत राहण्यासाठी धडपड करतांना दिसतात. सन्मानाचे जीवन मिळावे यासाठी त्यांचा आटापिटा चाललेला दिसून येतो. मग ती सिंधू असेल नाहीतर कविता, तुळसा, विद्या असो. जी सून म्हणून नवाजावी तीच सिंधू मुलाच्या अकाली जाण्याने अशुभ ठरते. एकाकी पडते. सासू-सासरे काढून देतात. हक्काचं घर सुटून जाते. आईवडिलांचे घर जवळ करणारी सिंधू शोषकांच्या शोषणाचा बळी पडते. जातपंचायतीच्या माध्यमातून तुक्याला गंडवण्याचा सल्ला मिळतो. परंतु स्वतःच्या अंतःकरणाशी प्रामाणिक असणारी सिंधू आपल्यासमोरचे खडतर आयुष्य निवडते व कायमची निघून जाते. कविता ही एक विधवा सासऱ्याच्या व आपल्या चिल्यापिलांच्या आधारानं भीक मागून जगणारी. ती शोषकाच्या तावडीत सापडते व अमानवीय शोषणाचा बळी ठरते. मागे शिल्लक उरतात ते आधारहीन लेकरं व म्हातारा सासरा. तुळसा ही या समाजातील प्रतिष्ठा मिरवणाऱ्या माणसांच्या कामप्रेरणा शमविणारं बाहुलं बनते. तिला पुरते ओरबाडल्या जाते. त्यातच तिचा अंत होतो. विद्या ही कोल्हाटी समाजातील स्त्री, जी स्वतःच्या घराच्या स्वप्नासाठी धडपडते परंतु तिच्या प्राक्तनात ते नसते. तुक्याची बायको जीवनाच्या स्थैर्यासाठी, लेकरासाठी तडफडते परंतु आर्थिक ओढाताण तिच्या नशिबी ते सुखही येऊ देत नाही. एक बोलका संघर्ष 'पडझड'मधून येत राहतो. परंतु

REDMI NOTE 6 PRO
MI DUAL CAMERA

जिवंत राहण्याची झापडे पडलेली असतात. त्याला वाचविण्याचा प्रयत्न केला जातो. शेवटी त्याच्या मृत्यूने त्यांच्या साऱ्या समस्या सुटून जातात. परंतु प्रश्न सुटत नाही. तो ज्वलंत होतो. त्याच्या या अपघाती मृत्यूने त्याच्या माणसांना काय मिळते? तर तीनशे रूपये आणि अर्धा पोते ज्वारी. माणसाच्या अवमूल्यनाच्या २१ व्या शतकामध्ये माणसाची ही किंमतही जास्तच म्हणावी लागेल. कारण माणसांच्या जीवनाला एवढी गती आली आहे की त्या गतीमुळे जवळून जाणाऱ्या माणसांचा आवाजही त्याच्या कानापर्यंत पोहचू शकत नाही. औपचारिकतेच्या या दुनियेत मानवी मूल्य ढासळले आहे, असे म्हणणे धाडसाचे ठरु नये.

भटक्या समाजातील जातपंचायतीचा पगडा एवढा क्रूर असतो की, त्यापायी कित्येक आयुष्ये उभ्या-उभ्याच उद्ध्वस्त होऊन जातात. परंतु त्याविरोधात बोलण्याची कुणाचीही हिंमतसुद्धा नसते. वडार समाजाच्या स्थितीशिलतेला ही जातपंचायत कशी कारणीभूत आहे याचा 'पडझड' या कादंबरीमधून सतत प्रत्यय येत राहतो. भटक्यांच्या आजच्या नेतृत्वाचा सांधा आपल्याला याच जातपंचायतीशी जोडता येऊ शकतो. नेतृत्व हे न्यायाच्या भूमिकेतून जन्माला येत असते. जिथे कुठे अन्याय होत असेल तेथील अन्याय मोडून काढण्यासाठी लोकांचे संघटन उभे करुन सरकारवर दबाव आणून न्याय मिळवून घेणे, हे नेतृत्वाचे ध्येय असते. त्या माध्यमातून होणारा लाभ हा सर्वांचा असतो. त्यावर कोण्या एकाचा अधिकार नसतो. परंतु तो अधिकार कोणी एक व्यक्ती जेव्हा सांगू लागतो तेव्हा स्वार्थी नेतृत्व जन्माला येते. तुक्याच्या माध्यमातून अशाच स्वार्थी नेतृत्वाला तोंडघशी पाडण्याचा एका अर्थाने उघडे करण्याचा प्रयत्न 'पडझड'मध्ये होतो. आपला संपूर्ण समाज एकत्र व्हायला पाहिजे, त्यांचे प्रबोधन व्हायला पाहिजे. जेणेकरुन त्यांची भटकी अवस्था जाऊन त्यांच्या जीवनात स्थिरता येईल. त्यांनाही आपल्या गावाचं नाव सांगता येईल. यासाठी भटक्यांच्या मेळाव्याची कल्पना त्यांच्या ठिकाणी जन्माला येते आणि ती फलद्रुपही होऊ पाहते. परंतु लोकांना मार्गदर्शन करण्यासाठीचे मानधन हे स्वार्थी नेतृत्व जेव्हा मागू लागते, मागते तेव्हा या माणसांच्या अस्तित्वावर मोठ्या झालेल्या या नेतृत्वाला काय म्हणावे हा प्रश्न इथे निर्माण होतो. शासनाच्या साऱ्या सोईसवलतींच्या माध्यमातून गब्बर झालेली ही माणसे स्वत:ची पोटे भरण्यासाठी जातपंचायतीचे आयोजन करणाऱ्या त्या अनादी नेतृत्वापेक्षा वेगळी वाटतच नाहीत. शोषण हाच त्यांचा धर्म असतो.

याच समाजातून मोठा झालेला पर्यायाने मुकादम झालेला गोइंद्या आपल्याच माणसांना लुबाडतो. मरेस्तोवर काम करुन घेतो व जेव्हा पैसे द्यायची वेळ येते तेव्हा अर्धेच पैसे देतो आणि याच एवढ्या पैशांमध्ये जमत नसेल तर कामावर येऊ नका,

आखीव दगड तयार करणे, रोड बनविण्यासाठी लागणारी गिट्टी फोडण्याचे काम, डांबर टाकण्याचे काम, मातीकाम, विहीर खोदण्याचे अवघड काम इत्यादी कामे करुन गावोगाव भटकंती करणारा वडार समाज, आपलं बिराडं शाकारण्यासाठी परवानगी मागणारा दयेचा दास 'पडझड'मधून दिसून येतो.

अशोक पवार यांनी तुकाराम ही व्यक्तीरेखा अत्यंत संयमाने 'पडझड'मध्ये उभी केली आहे. म्हणजेच तुकाराम या 'पडझड'चा नायक आहे. त्याच्या निरीक्षणातून या कादंबरीतील व्यक्तीरेखांशी वाचकांना परिचय होत जातो. तुकाराम उर्फ तुक्या विचारी आहे आणि एका विचारी माणसांच्या ठिकाणी संपूर्ण जग बदलविण्याची धमक असते. जर तो आपल्या नेमक्या भूमिकेपासून ढळला नाही तर! डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या प्रगतीची कवाडे उघडायची असतील तर शिक्षण महत्त्वाचे मानले व अखंडपणे जगणेच नाकारलेला कालचा समाज प्रगतीच्या दिशेने चालू लागला. शिकू लागला. तुकारामपर्यंत हा शिक्षणाचा विचार येऊन पोहोचला, म्हणून बिराडामध्ये इतर कोणाबरोबर तोही शिकू लागला. त्याच्या आईला या भटक्या जीवनाचा कंटाळा आलाय म्हणून ती वारंवार तुकारामला 'सुधरुन' जाय म्हणते. वडार समाजावरील कलंक पुसून टाक म्हणते. इयत्ता पहिली ते बी.ए. होईपर्यंतचा त्याचा संघर्षात्मक प्रवास जागतिकीकरणामध्ये अगतिकतेची जागोजागी जाणीव करुन देतो. तो कष्टाळू आहे. तो संयमी आहे, तो विचारी आहे. तो चारचौघांसारखा नाही म्हणून त्याला मोठे होण्याची स्वप्ने पडत राहतात. त्याचे वर्तमान त्याला स्वस्थ बसू देत नाही. तो तुलना करीत नाही परंतु आपल्याही वाट्याला यायला पाहिजे, या आतडेतोड आकांताने तो आतल्या आत धुमसत राहतो. आम्ही खरकटे उष्ट्याचे हकदार का? आणि तेही जेव्हा सन्मानाने मिळत नाही तेव्हा तो सरळ समाजाच्या मक्तेदारांच्या पंगतीत जाऊन जेऊ लागतो व एकदा पोट भरेस्तोवर मारही खातो.

'पडझड'मधून केवळ वडार समाजाच्या वेदना तेवढ्या नजरेत भरतात. असे जरी असले तरी समदुःखी अशा काही भटक्या जमातींचाही उल्लेख येऊन जातो. जसे कैकाडी, कोल्हाटी, पारधी, बहुरूपी, कुडमुडे जोशी इ. परंतु दृष्टी स्थिर होते ती वडार समाजावर. दिवसभर कष्ट उपसणारी माणसे जेव्हा रात्री दारु पिऊन तर्र होऊन जातात तेव्हा वर्तमानाला कसे तरी ढकलणे हा प्रश्न त्यांच्यासमोर ज्वलंत असतो. आपली मुले भीक मागतात, बाया नाही ते काम करायला आपल्यापुढे तयार होतात, याचे या माणसांना काहीच वाटत नाही. आपल्या वाट्याला आलेलं आयुष्य जगायचं, दारु प्यायचं, डुकरं मारायची ही भूमिका त्यांचा शीण कमी करु पाहते. असेच कष्टाचे रोडचे काम करणारा खंडू अंगावर उकळते डांबर पडून भाजल्या जातो. त्यांचा आकांत त्याच्या लेकरा-बायकोशिवाय कुणाला दिसत नाही कारण साऱ्यांच्या डोळ्यावर



REDMI NOTE 6 PRO
MI DUAL CAMERA

स्वातंत्र्यपूर्व कालखंडामध्ये जीवनाची एक प्रकारची स्थितीशीलता दिसून येते. त्या स्थितीशीलतेला कारणंही तशीच आहेत. त्या दिशेने अखंड जीवनच पाहायचं झाल्यास माणसांच्या गरजा अत्यंत सिमीत होत्या. त्या माणसांना फारसा सोस नव्हता. आजच्या भौतिक साधनांच्या उपभोगाचा. त्यातल्या त्यात भारतीय खेड्यांचा, ग्रामाचा विचार करत असतांना जीवनाचे मर्यादित स्वरूपच आपणास पाहायला मिळते. म्हणजेच प्रत्येकाने परंपरेने ठरवून दिलेले जीवन गुमान जगावे कारण ही परंपराच त्या माणसाच्या गरजांची पोशिंदा होती. बलुतेदारीने प्रत्येक माणूस एक दुसऱ्याशी बांधल्या गेला होता. त्यातून बाहेर पडणे हे धाडस करण्याची आवश्यकताच त्याला वाटत नव्हती. हे गावगाड्यातील 'जीवनचक्र' ही बलुतेदारी पद्धती अव्याहतपणे चालवित होती. कारण त्याशिवाय ग्रामसंस्कृती तग धरु शकणार नव्हती. परंतु मुळ प्रश्न इथे गावगाड्याचा नाहीच. लेखक अशोक पवार यांनी गावगाड्याबाहेर फेकल्या गेलेल्या समाजाचा विचार केला. ज्याला स्वतःचे अश्रूही नाहीत, जे स्वतःचे सांत्वन किंवा आनंद व्यक्त करु शकतील, जो पूर्णपणे अवलंबून आहे गावगाड्यातून फेकल्या जाऊ पाहणाऱ्या अन्नावर, त्यांच्या दयेवर, जो समाजाचा अखंड शाप घेऊन जगत आहे आणि तो म्हणजे गुन्हेगार असण्याचा- चोर असण्याचा! कुठेतरी अशा ठिकाणी जिथे पाण्याचा आणि खाण्याचा प्रश्न सुटू शकेल. अशा सर्वदूर पसरलेल्या भटक्या समाजाचा उद्गार अशोक पवार 'पडझड'च्या माध्यमातून मांडू पाहतात. कारण स्थिरता आजही नाही, याची जाणीव 'पडझड' ही अशोक पवार यांची आत्मकथनात्मक कादंबरी मुंबईच्या लोकवाङ्मय गृहाने डिसेंबर २०११ मध्ये ती प्रकाशित केली. आणि पुन्हा एकदा 'वडार' समाजाच्या नव्हे तर एकूणच भटक्या समाजाच्या चिंतनासाठीचे एक विचारपीठ तयार झाले. स्वातंत्र्याने आम्हाला काय दिले? हा गंभीर प्रश्न आजही माणसांच्या मुसक्या बांधतो कारण बोलणे हे सभ्यपणाचे लक्षण नसते. परंतु एखादा 'ढसाळ' या सभ्यपणाच्या नागडेपणाचे दर्शन घडवतो व चिंतनाला सुरुवात होते. स्वातंत्र्याचे लाभ आजही त्याच माणसांना मिळत आहेत जे स्वातंत्र्यात कालही कुठेच नव्हते. ज्यांनी कांगावा केला ते शिलेदार झाले आणि ज्यांनी या स्वातंत्र्याची पायाभरणी केली ते भटके झाले. स्वातंत्र्यानंतर माणसाचे मुलभूत प्रश्न सुटतील अशी रास्त अपेक्षा होती कारण अपेक्षा करण्याचा अधिकार राबणाऱ्यांना निश्चितच असतो. परंतु भ्रमनिरासतेच्या पलीकडे आजही त्यांच्या ताटात काहीच पडत नाही. असा समाज की, ज्याच्या प्रतिभेकडे आधुनिक कालखंडात कधी बघितलेच गेले नाही. अत्यंत कष्टाची कामे करणारा समाज म्हणून वडार समाजाकडे बघितले गेले. कष्ट करणे आणि पोट भरणे हा त्याचा जणू खाक्याच. चिरेबंदी वाडा उभा करण्यासाठीचे



REDMI NOTE 6 PRO
MI DUAL CAMERA

# पडझड

## 'मानवी अवमूल्यनाचा लेखाजोखा'

डॉ. विनोद इंगळे

जगण्याचं सामर्थ्य घेऊन हरेक जीव या गतिमान सृष्टीचा एक दमदार घटक म्हणून जन्माला येतो. एका अर्थाने जगण्याची कुवतच त्याच्यात निसर्गाने ठसठसून भरलेली असते. त्याचं निमित्त म्हणजे त्याचे जन्माला येणे असते. सृष्टी कुणालाही, कुठल्याही जीवाला अवमानीत करुन, अवमानीत म्हणून जन्माला घालीत नाही. तिच्या मुक्तहस्ते त्या त्या जीवाची घडण आणि प्रकटणे निश्चित झालेले असते. म्हणूनच माणसाने किंबहुना विचारी माणसाने माणसाशी माणसासारखे वागावे, हा सिद्धांत मांडल्या गेला असावा. व्यक्ती ज्या ठिकाणी राहतो त्याला समाजच म्हणतात. कारण समाज हा माणसांचा असतो त्यामुळे काही अपेक्षा ठरलेल्याच असतात. समाजाचा विचार करीत असतांना मतभिन्नतेबरोबरच पर्यावरणीय भिन्नताही सहज लक्षात येते. कारण ज्या पर्यावरणामध्ये व्यक्ती आपले जीवन व्यतीत करीत असतो. त्या पर्यावरणीय प्रेरक तत्वांचा जबरदस्त परिणाम साहजिकच त्याच्यावर होत राहतो कारण, तो त्या आवाहक वास्तव बिंदूपासून आपल्या संपन्न जीवनाची वीण तयार करण्याची जबरदस्त इच्छा घेऊन उभा राहतो. यातूनच त्याची समाजाकडे पाहण्याची एक दृष्टी तयार होते. ती अशी, म्हणजेच एकतर तो समाजाला पर्यायाने त्यातील माणसांना तो पाण्यात पाहायला लागतो नाहीतर अंत:करणातसुद्धा. सामाजिक स्तरीकरण हे आणखी एक वेगळेपण समाजाचं सांगता येईल. शेवटी या सर्वांचा केंद्रबिंदू माणूसच आहे. माणसाला बाद करुन, टाळून समाजाची व्याख्याच करता येणार नाही. कारण कोणत्याही विचारांचा आदी, मध्य आणि अंत्य माणूसच आहे. त्याच माणसाला समजून घेण्याचा प्रयत्न किंबहुना शोधण्याची जिद्द उरी बाळगून अशोक पवार 'पडझड' मांडत जातात. त्यांच्या श्वासाचं सामर्थ्य म्हणजे 'पडझड' म्हणता येईल.



REDMI NOTE 6 PRO
MI DUAL CAMERA

» वडारांच्या भेदक जगण्यावर मंथन करणारी गतिशील कादंबरी/१११
- डॉ.सोपानदेव पिसे

तसव्या : .................................................. ११९ ते १४८
» एका ध्येयवेड्या स्त्रीची संघर्षमय कहाणी /११९
- डॉ.वैजनाथ अनमुलवाड
» नायिकेचा जीवनसंघर्ष चितारणारी कादंबरी /१२८
- प्रा.मनेश लिंबोरे
» 'तसव्या' कादंबरीचे अंतरंग तपासतांना /१३६
- डॉ.गजानन लोहवे
» ध्येयाने झपाटलेल्या तरुणीच्या संघर्षाची कहाणी /१४१
- डॉ.बाबाराव ठावरी

भुईभेद : .................................................. १४९ ते १७८
» पवारी स्टाईलची नवी कादंबरी /१४९
- बाबाराव मुसळे
» समकालीन प्रश्नांच्या वाताहतीची कैफियत मांडणारी कादंबरी/१५८
- डॉ.अनंता सूर
» हरवत चाललेल्या खेड्याच्या पडझडीचे चित्रण /१६८
- रमेश चिल्ले
» वास्तव दर्शन घडवणारी कादंबरी /१७४
- भास्कर गायकवाड

परिशिष्ट–१ लेखकांचा अल्पपरिचय /१८०
परिशिष्ट–२ अशोक पवारांचे साहित्य आणि पुरस्कार / १८९
परिशिष्ट–३ अशोक पवारांची मुलाखत / १९२

## अंतरंग

इळनमाळ : .................................................. १७ ते ४३

» **बैलदाराच्या हृदयद्रावक जीवनाची कथा /१७**
*- डॉ.शरणकुमार लिंबाळे*

» **आजची कादंबरी – नोंदी आणि निरीक्षणे /२५**
*- प्रा.रंगनाथ पठारे*

» **भटक्या विमुक्त जमातीच्या व्यथावेदना /३१**
*- डॉ.अेकनाथ पगार*

» **जगण्याची संघर्षगाथा /३६**
*- डॉ.श्याम मोहरकर*

दर कोस दर मुक्काम : .................................................. ४४ ते ९०

» **पारध्यांची जीवघेणी कहाणी /४४**
*- डॉ.विनायक त्रिपत्तीवार*

» **पारध्यांच्या व्यथावेदनांची भळभळती जखम /५९**
*- डॉ.राजेंद्र मुंढे*

» **पारध्यांच्या एकाकी जीवनसंघर्षाचा जाहीरनामा /७०**
*-डॉ.रूपेश कऱ्हाडे*

» **पोटासाठी अपराधी ठरलेल्या पारध्यांची व्यथा /८३**
*- रवींद्र गुरव*

पडझड : .................................................. ९१ ते ११८

» **वडारांच्या विद्यमान स्थितीगतीवर भाष्य करणारी कादंबरी /९१**
*- डॉ.इसादास भडके*

» **भटक्यांची कैफियत मांडणारी जननिष्ठ कादंबरी /९६**
*- डॉ.नीळकंठ मेंढे*

» **मानवी अवमूल्यनाचा लेखाजोगा /१०५**
*- डॉ.विनोद इंगळे*



REDMI NOTE 6 PRO
MI DUAL CAMERA

Prashant

प्रशांत पब्लिकेशन्स

**भटक्यांची भ्रमणगाथा मांडणारा कादंबरीकार : अशोक पवार**

Bhatkyanchi Bhramangatha Mandnara Kadambrikar : Ashok Pawar

© संपा. डॉ. अनंता सूर

मराठी विभागप्रमुख; श्री गजानन महाराज महाविद्यालय,
ता. झरी (जामणी), जि. यवतमाळ पिन ४४५३०४.
संवाद : ९४२१७७५४८८

प्रकाशक
रंगराव पाटील
प्रशांत पब्लिकेशन्स
३, प्रताप नगर, श्री संत ज्ञानेश्वर मंदिर रोड,
नूतन मराठा महाविद्यालयाजवळ, जळगाव ४२५००१.
दूरध्वनी : ०२५७-२२३५५२०,२२३२८००
Email : prashantpublication.jal@gmail.com
Website : www.prashantpublications.com

पहिली आवृत्ती : १ ऑगस्ट २०२२
ISBN 978-93-94403-55-0

मुद्रण : थॉमसन प्रेस (इंडिया) लि., दिल्ली
अक्षरजुळवणी : प्रशांत पब्लिकेशन्स

मूल्य : ₹ ३२५ | $ १० | £ ८

# भटक्यांची भ्रमणगाथा मांडणारा कादंबरीकार

# अशोक पवार

-: संपादक :-

**डॉ. अनंता सूर**

Prashant

प्रशांत पब्लिकेशन्स

REDMI NOTE 6 PRO
MI DUAL CAMERA



डॉ. अनंता सूर

## ॥ तीन दगडांच्या चुलीचा भाईबंद! ॥

अशोक पवार हा तीन दगडांच्या चुलीचा एक भाईबंद. भटक्या-विमुक्तांच्या जगण्यातले दुःख आपल्या स्वकथनातून आणि कादंबरीलेखनातून मांडणारा आपल्या पिढीतील महत्त्वाचा लेखक.

संपूर्ण देशात सत्ताधारी वर्गाकडून कार्पोरेट माहोलाच्या प्रभावातून जनतेला महासत्तेची स्वप्ने दाखवली जात असताना आजही या देशातील भटके-विमुक्त जातिसमूह त्यांच्या मूलभूत गरजांपासून मात्र कोसो दूर आहेत! त्यांच्या जगण्यातील प्राणी पातळीवरचा संघर्ष आणि मानवी पातळीवरील त्यांच्या जगण्यातले दुःख हे अशोक पवारच्या एकूणच कादंबरीलेखनाचे मध्यवर्ती सूत्र आहे. हे सूत्र आपल्याला भारतीय समाजव्यवस्थेचे समाजशास्त्र आणि स्वातंत्र्योत्तर काळातील मानवी संवेदन ह्या अंगाने अंतर्मुख होऊन गंभीरपणे विचार करायला भाग पाडणारे आहे.

या पार्श्वभूमीवर, सामाजिक बांधिलकीच्या अंगाने अशोक पवारच्या कादंबरीलेखनाचे अंतःसूत्र समजून घेण्याच्या दृष्टीने त्यांच्या 'इळनमाळ', 'दर कोस दर मुक्काम', 'पडझड', 'तसव्या' आणि 'भूईभेद' यांसारख्या कादंबऱ्यांवरील अभ्यासकांचे काही मर्मग्राही लेख एकत्रित करून डॉ. अनंता सूर यांनी संपादित केलेल्या प्रस्तुत ग्रंथातील चिंतन अत्यंत मौलिक स्वरुपाचे ठरावे, असेच आहे. हे चिंतन मराठी साहित्याच्या वाचकमनातील मानवी संवेदनांच्या व समाजशास्त्रीय अन्वयाच्या सहसंबंधाने निश्चितच आकलनाच्या पातळीवरील नव्या दिशा स्पष्ट करण्यासाठी उपयुक्त ठरेल, याबद्दल आश्वस्त करणारे आहे.

- डॉ. अशोक नामदेव पळवेकर

साहित्य समीक्षा ₹ 325
ISBN 978-93-94403-55-0
Prashant
www.prashantpublications.com
prashantpublication.jal@gmail.com
Also Available in e-Book



भटक्यांची भ्रमणगाथा
मांडणारा कादंबरीकार
अशोक पवार
संपादक
डॉ. अनंता सूर
पडझड
अशोक पवार
भुईभेद
अशोक पवार
Prashant
REDMI NOTE 6 PRO
MI DUAL CAMERA